**राज्यशास्त्र**

**अर्थ, स्वरुप आणि व्याप्ती**

**प्रास्ताविक**:—

'मानव हा समाजशील प्राणी आहे'. (Man is social animal) असे थोर ग्रीक विचारवंत ॲरिस्टॉटल यांनी म्हटले आहे. मानवाच्या समुह वृत्तीतून समाजाची निर्मिती झाली आहे. संरक्षण आणि संवर्धन यासाठी मानवप्राणी समूह करुन राहू लागला. कुटूंब — विवाह संस्था, शिक्षण संस्था, धार्मिक संस्था, सांस्कृतिक संस्था अशा विविध स्वरुपाच्या संस्था स्थापन करण्यात आल्या. व्यक्तींचा या विविध संस्थांशी नेहमी संबंध येऊ लागला. मनुष्य राजकीय प्राणी असल्यामुळे समाज राजकीय स्वरुपाचा बनला गेला. अशा प्रकारे राजसंस्था व शासनसंस्था यांचा अभ्यास करणारे सामाजिक शास्त्र म्हणून राज्यशास्त्राला महत्त्व प्राप्त झाले.

'सत्ताविषयक शास्त्र म्हणजे राज्यशास्त्र होय.' विशिष्ट भूप्रदेशात कायम वास्तव्य करुन राहणाऱ्या सर्व संस्थांवर आणि समाजावर प्रभाव टाकणारी शक्ती किंवा सामर्थ्य म्हणजे सत्ता होय. कर्तव्यपालन, कर्तव्यपूर्ती करवून घेणे आणि कर्तव्यभंग करणाऱ्यास शिक्षा करणे यास राजकीय सत्ता असे म्हणतात. विशिष्ट भूप्रदेशातील राजकीय समाजाचे संरक्षण आणि संवर्धन करणे हे राजकीय सत्तेचे प्रधानकार्य असते. अशा राजकीय, सामाजिक सत्तानिर्मिती, तिचा वापर आणि ऱ्हास यांचा अभ्यास राज्यशास्त्रात केला जातो.

**राज्यशास्त्राच्या व्याख्या :—**

- जे. डब्ल्यु गार्नर :— 'राज्यशास्त्राच्या अभ्यासाचा प्रारंभ राज्यापासून होऊन त्याचा शेवटही राज्याच्या अभ्यासातच होतो.'
- पॉल जेनेट :— 'राज्यशास्त्र हा सामाजिक शास्त्राचा असा भाग आहे की, ज्यामध्ये राज्याची आधारभूत तत्वे आणि शासन संस्थेची मुलभूत तत्वे यांचा विचार केला जातो.'
- आर.जी.गेटेल :— 'ऐतिहासिक दृष्टिकोनातून भूतकाळात राज्य कसे होते, वर्तमानकाळात राज्य कसे आहे आणि नैतिकदृष्टया भविष्यकाळात राज्य कसे असावे यासंबंधीचा अभ्यास करणाऱ्या शास्त्राला राज्यशास्त्र असे म्हणतात'
- प्रा. सीली :— 'ज्याप्रमाणे अर्थशास्त्रात संपत्तीचा, प्राणिशास्त्रात जीविताचा, बीजगणितात अंकांचा आणि भूमितीत स्थळ आणि उंची यांचा शोध घेतला जातो, त्याचप्रमाणे राज्यशास्त्रात शासन संस्थेच्या तत्वांचा शोध घेतला जातो'

**राज्यशास्त्राचे स्वरुप (Nature of Political Science) : -**

राज्यशास्त्राचे स्वरुप जाणून घेताना Political Science आणि Political Philosophy या तीन संकल्पना समजून घेणे आवश्यक ठरते. राजकारण, राज्यशास्त्र आणि राजकीय तत्वज्ञान या शब्दांना विशिष्ट अर्थ आहेत. ॲरिस्टॉटलने आपल्या ग्रंथाला Politics असे नाव दिलेले आहे. कौटिल्याने आपल्या राजकीय ग्रंथाला 'अर्थशास्त्र' असे नाव दिले आहे. राजधर्म, राजनिती असा उल्लेख महाभारत, रामायण यातून आढळतो. ॲरिस्टॉटलने ग्रीक नगरराज्याच्या राज्यकारभारा संबंधीचे अवलोकन करुन पॉलिटिक्स हा ग्रंथ लिहीला आहे. परंतु अलीकडे आधुनिक राजकीय विचारवंत राज्यशास्त्राला Politics असे संबोधू लागले आहेत. कारण राजकारण Politics हा शब्द राज्यशास्त्र याअर्थी वापरणे तेवढेसे योग्य वाटत नाही. सध्या प्रचलित राजकारणासंबंधी बोलताना Politics हा शब्द वापरला जातो. भारताचे राजकारण (Indian Politics ) हे पाकिस्तानच्या राजकारणापेक्षा (Politics of Pakistan) वेगळे आहे. सामान्यत: देशातील विद्यमान राजकीय घडामोडी, राजकीय प्रश्न, त्यावरील उपाययोजना, राजकीय वातावरण, राजकीय डावपेच, राजकीय खेळी इत्यादींबाबत Politics हा शब्द वापरला जातो. त्यामुळे आधुनिक राज्यशास्त्रज्ञांनी Politics ऐवजी Political Science हा शब्द वापरण्यास सुरुवात केली आहे. राज्यशास्त्र म्हणजे राज्यासंबंधीचे शास्त्र होय. राज्य, राज्याचा उदय, विकास, शासनसंबंधी त्यांचे अधिकार, कार्ये, नागरिक व राज्य यांचे संबंध, नागरिकांचे अधिकार, आंतरराष्ट्रीय संबंध, इत्यादींबाबत राज्यशास्त्र अभ्यास करते. राज्यासंबंधीच्या सर्व राजकीय क्रिया – प्रक्रियांचा आणि कार्यांचा समावेश राज्यशास्त्रात केला जातो.

राज्यशास्त्रात राजकीय सिध्दांत आणि शासनसंस्था यांचा समावेश केला जातो. विविध प्रकारचे राजकीय सिध्दांत आणि शासन संस्थांचे विभाग व त्यांचे अधिकार यांचा अभ्यास राज्यशास्त्रात केला जातो. प्रो. गेटेल, डॉ. लिकॉक या विचारवंतांनी राज्य आणि शासन संस्था यांचा अभ्यास करणारे शास्त्र या अर्थी राज्यशास्त्र शब्द वापरला आहे. प्रो. गेटेलच्या ग्रंथाचे नाव Introduction to Political Science डॉ. लिकॉकच्या ग्रंथाचे नाव Elements of Political Science असे आहे. प्रो. लास्की यांनी A Grammar of Politics हा ग्रंथ लिहीला. लास्की यांनी राजकीय सिध्दांत, राजकीय संस्था, संघटना, आंतरराष्ट्रीय संस्था यासंबंधीचा अभ्यास या ग्रंथात केला आहे. ग्रॅहॅम वालासने यांनी लिहिलेल्या Human Nature in Politics या ग्रंथात राजकारणांतील मानवी स्वभावाचे विश्लेषण केलेले आहे.

**राज्यशास्त्राची व्याप्ती ( The Scope of Political Science) : -**

राज्यशास्त्रात सर्व राजकीय व्यवहारांचा आणि क्रिया — प्रक्रियांचा अभ्यास केला जातो. राज्यासंबंधीचे तसेच राज्यकारभारासंबंधीचे नियम, तत्त्वे, सिध्दांत, विचारप्रणाली यांचा अभ्यास राज्यशास्त्रात केला जातो. राजकीय सिध्दांत आणि प्रत्यक्षात शासन संस्थेद्वारे चालणारी कार्ये यांचा समावेश राज्यशास्त्रात केला जातो. राजकीय सिध्दांत आणि प्रत्यक्षात शासन संस्थेद्वारे चालणारी कार्ये यांचा समावेश राज्यशास्त्रात केला जातो. विविध विचारवंतांनी राज्यशास्त्राची व्याप्ती पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे.

१. प्रो. गेटेल यांच्या मते, राज्याचा उदय, राज्याचे स्वरुप, भूतकाळात राज्याचे स्वरुप कसे होते ? भविष्यकाळात राज्याचे स्वरुपा कसे असावे ? इत्यादीसंबंधीचा अभ्यास राज्यशास्त्रात केला जातो.

२. प्रो. गार्नर यांच्या मते, राज्यशास्त्रात राज्याचा उदय, स्वरुप, इतिहास आणि विकास यासंबंधीचा अभ्यास केला जातो.

३. शासन संस्थेद्वारे होणारी राज्याची अभिव्यक्ती आणि त्यासंबंधीचा अभ्यास राज्यशास्त्रात केला जातो असे डॉ. लिकॉक यांचे मत आहे.

४. सर फ्रेडरिक पोलॉक यांच्या मते, राज्यशास्त्रात राज्यसंस्थे विषयीचे सिध्दांत, तत्वे आणि शासन यांचा अभ्यास केला जातो.

५. स्विस विचारवंत ब्लंटली यांच्या मते, राज्य संस्था आणि शासन संस्था यांचा अभ्यास राज्यशास्त्रात केला जातो.

वरील विविध राजकीय विचारवंताच्या मतांचा आढावा घेतला तर असे म्हणता येईल की, राज्यशास्त्रात राज्यसंस्था आणि शासनसंस्था यासंबंधीचा अभ्यास केला जातो. वास्तविक वरील विचारवंतांच्या पूर्वीच ॲरिस्टॉटल यांनी राज्याच्या निर्मितीचा उद्देश स्पष्ट केला होता.

इ.स. १९४८ मध्ये युनेस्को या संस्थेने राज्यशास्त्राच्या व्याप्तीसंबंधी एक परिसंवाद आयोजित केला जातो. त्यावेळी राज्यशास्त्राच्या व्याप्तीत पुढील विषयांचा समावेश करण्यात आला.

१. राजकीय सिध्दांत :— राजकीय सिध्दांत, राजकीय तत्त्वे, संकल्पना यांचा अभ्यास
२. राजकीय संस्था संघटना :— राज्यघटना, राष्ट्रीय शासन संस्था, प्रादेशिक व स्थानिक स्वराज्य संस्था, लोकप्रशासन, राजकीय संस्थांचा तुलनात्मक अभ्यास.
३. राजकीय पक्ष, समूह आणि लोकमत :— राजकीय पक्ष, समूह, संघटना, नागरिकांचा राजकारण आणि प्रशासन यातील राजकीय सहभाग. लोकमत यासंबंधीचा अभ्यास.
४. आंतरराष्ट्रीय संबंध :— आंतरराष्ट्रीय राजकारण, आंतरराष्ट्रीय संघटना, आंतरराष्ट्रीय कायदा, प्रशासन यासंबंधीचा अभ्यास.

एच. जे. मॉर्गेंथो यांच्या मते, राज्यशास्त्राच्या नव्या अभ्यासक्रमात पुढील तीन महत्वाच्या विषयांचा समावेश केला जातो.

१. राजकीय समाजशास्त्र (Political Sociology)

२. राजकीय सिध्दांत (Political Theory)

३. राजकीय संस्था (Political Institutions)

सामान्यत: राज्यशास्त्राच्या व्याप्तीत पुढील विषयांचा समावेश करण्यात येतो.

१. राज्य आणि नागरिक यांच्या संबंधांचा अभ्यास : — राज्याची निर्मिती लोकहिताच्या दृष्टिकोनातून झाली आहे. व्यक्तीच्या संरक्षणासाठी आणि सर्वांगीण विकासासाठी राज्यसंस्था आवश्यक व महत्त्वाची मानली जाते. राज्यातील लोक हा राज्यनिर्मितीचा महत्त्वाचा घटक मानला जातो. राज्यशास्त्रात नागरिक आणि राज्य यांच्या संबंधाचा अभ्यास केला जातो. नागरिकांचे अधिकार, कर्तव्ये, राज्याचे अधिकार व लोक कल्याणाची कार्ये इ. गोष्टींचा सविस्तर अभ्यास राज्यशास्त्रात केला जातो.

२. राज्यसंस्थेचा अभ्यास :— राज्यशास्त्रात राज्याचा उदय, विकास, स्वरुप, कार्ये याविषयीचा अभ्यास केला जातो. राज्याच्या उदयाचे सिध्दांत, सार्वभौमत्वासंबंधीचे सिध्दांत आणि राज्याची कार्यपध्दती यांचा अभ्यास राज्यशास्त्रात केला जातो. राज्यशास्त्रात राज्याचा उद्देश, ध्येये, राज्याचा इतर संस्थांशी असणारा संबंध याविषयी अध्ययन केले जाते. स्थूलमानाने राज्यासंबंधीचे शास्त्र ते राज्यशास्त्र असे म्हणणे योग्य ठरेल.

३. शासन विषयक अभ्यास :— शासन संस्थेचे स्वरुप, शासन संस्थेची अंगे, कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ, त्यांचे स्वरुप व कार्ये, कायदेनिर्मिती, त्यांची अंमलबजावणी, न्यायदान अशी कार्ये इ. स्वरुपाचा अभ्यास राज्यशास्त्रात केला जातो. शासनसंस्थेला लोककल्याणाची बहुविध कार्ये करावी लागतात. शासन पध्दती विविध प्रकारच्या असतात. संसदीय, अध्यक्षीय, राजेशाही, महाजनशाही, साम्यवादी, हुकूमशाही अशा विविध स्वरुपाच्या शासनपध्दतींचा अभ्यास राज्यशास्त्रात केला जातो.

४. विविध राजकीय विचारप्रणाली :— राज्यशास्त्रात विविध स्वरुपाचे राजकीय सिध्दांत आणि राजकीय विचारप्रणालींचा अभ्यास केला जातो. लोकशाही, समाजवाद, साम्यवाद, नाझीवाद, फॅसिझम, दहशतवाद, अराज्यवाद इ. विचारप्रणालींचा अभ्यास राज्यशास्त्रात केला जातो. भूतकाळात घडलेल्या राजकीय घडामोडी, प्रचलित वर्तमान स्थिती यांचा विचार करुन जी राजकीय तत्वे, सिध्दांत मांडले जातात. त्यांचा अभ्यास राज्यशास्त्रात करावा लागतो.

५. सार्वभौमत्वाचा अभ्यास :— सार्वभौमत्वाचे स्वरुप, प्रकार, सिध्दांत याविषयी राज्यशास्त्रात अभ्यास केला जातो. ऑस्ट्रिनचा सार्वभौमत्त्वाविषयी सिध्दांत, अनेक सत्तावाद, सार्वभौमत्वाची लक्षणे आणि मर्यादा इ. स्वरुपाचा अभ्यास राज्यशास्त्राच्या व्याप्तीत आढळून येतात.

६. विधिनियम, प्रशासकीय कायदे व प्रशासन यंत्रणा :— यांविषयी राज्यशास्त्रात अभ्यास केला जातो. राज्यघटनेतील तत्त्वे, नियम, कायदेमंडळाने केलेले कायदे, प्रदत्त कायदे, प्रशासकीय नियम, त्यांची अंमलबजावणी इत्यादी स्वरुपाचा अभ्यास राज्यशास्त्रात आढळतो.

७. आंतरराष्ट्रीय संबंधाचा अभ्यास :— राज्याराज्यातील संबंध, आंतरराष्ट्रीय संघर्ष, आंतरराष्ट्रीय शांतता, जागतिक राजकारण, विश्वराज्याची कल्पना इत्यादी स्वरुपाचा आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास राज्यशास्त्रात केला जातो.

८. राजकीय पक्ष, दबाव गट व लोकमत :— राजकीय पक्ष, स्वरुप, कार्ये, पक्षपद्धती, दबाव गट, त्यांचे महत्त्व, लोकमत, लोकमत घडविण्याची साधने इ. विषयासंबंधी राज्यशास्त्रात अभ्यास केला जातो.

९. स्थानिक राज्यकारभार आणि कल्याणकारी राज्य :— यासंबंधीचा अभ्यास राज्यशास्त्रात केला जातो. स्थानिक राज्यकारभाराचे स्वरुप, ग्रामीण प्रशासन, नागरी प्रशासन, स्थानिक प्रशासनाचे महत्त्व, सत्तेचे विकेंद्रीकरण, कल्याणकारी राज्य इ. स्वरुपाचा अभ्यास राज्यशास्त्राच्या व्याप्तीत समाविष्ट केला जातो.

१०. राजकीय संकल्पनांचे विश्लेषण :— आधुनिक राजकीय विचारवंतांची विविध प्रकारच्या राजकीय संकल्पनांचे विश्लेषण केलेले आहे. राजकीय व्यवस्था, व्यवस्थावाद, रचनात्मक कार्यवाद, राजकीय संस्कृती, राजकीय समाजीकरण, राजकीय परिवर्तन, राजकीय विकास, राजकीय श्रेष्ठिजन, राजकीय संसूचन इत्यादी राजकीय संकल्पनांचे विश्लेषण आधुनिक राज्यशास्त्रात केले जाते.

वरील विविध विषयासंबंधीच्या अभ्यासाचा समावेश राज्यशास्त्राच्या व्याप्तीत केला जातो. त्यामुळे राज्यशास्त्राची व्याप्ती झालेली आहे. राज्यशास्त्र हे गतिशील व विकासवादी असल्यामुळे राज्यशास्त्राची व्याप्ती नेहमी वाढत असलेली दिसते. आधुनिक काळात राज्यशास्त्राच्या अभ्यासासाठी नवनवीन पध्दतींचा स्विकार केला जात आहे. तुलनात्मक पध्दती, शास्त्रीय पध्दती, मानसशास्त्रीय पध्दती, संख्याशास्त्र पध्दती इ. पध्दतींचा स्विकार केल्यामुळे राज्यशास्त्राच्या व्याप्तीत नवीन भर पडत आहे. तात्त्विक आणि वास्तववादी अशा दोन्ही पध्दतीने राज्यशास्त्राचा अभ्यास केला जात असल्याने राज्यशास्त्राच्या अभ्यासाचे स्वरुप अधिक व्यापक बनलेले आहे.

**राज्यशास्त्राचे महत्त्व :—**

१. लोकशाही मूल्ये रुजविणे :— आधुनिक युग हे लोकशाहीचे युग म्हणून ओळखले जाते. लोकशाहीची धारणा आणि मूल्ये रुजविण्यासाठी राज्यशास्त्र या विषयाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यामुळ आज जगातील बहुतांश देशातील विद्यापीठात राज्यशास्त्राचा अभ्यास केला जात आहे.

२. राज्य व नागरिक यांच्यातील संबंध निश्चित करणेसाठी राज्यशास्त्र महत्त्वाचे मानले जाते. राज्यसंस्थेला असणारे अधिकार आणि नागरिकांना असणारे हक्क यांच्यात संतुलन असणे आवश्यक आहे. हे संतुलन बिघडल्यास व्यक्ती स्वातंत्र्य धोक्यात येते.

३. राजकीय व्यवस्था समजणेसाठी राज्यशास्त्राचा अभ्यास आवश्यक आहे. राजकीय व्यवस्थेमध्ये अधिकारांचे वाटप कशा प्रकारे करण्यात आले आहे. हे नागरिकांना समजण्यासाठी राज्यशास्त्राचा अभ्यास महत्त्वाचा आहे.

४. लोकमत ठरविण्यासाठी लोकशाहीत लोकमत निर्माण करण्यासाठी सुजाण नागरिक निर्माण करणे गरजेचे असते. राजकीय जागृतीतून चांगले लोकमत तयार होत असते.

५. नवीन राजकीय विचार मांडणेसाठी राज्यशास्त्राचा अभ्यास करणे आवश्यक आहे. गेल्या तीन — चार शतकात राज्यशास्त्राच्या अभ्यासामध्ये नवनवीन सिध्दांत मांडण्यात आले आहेत. सिध्दांताची समिक्षा करण्यात आली आहे. त्यातून नवीन विचार किंवा सिध्दांत विकसित झाले आहेत.

६. जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रयत्न सुरु आहेत. त्याचा अभ्यास राज्यशास्त्रात केला जातो.

७. राजकीय नेतृत्व आणि प्रशासनातील वरिष्ठ सनदी सेवक यांच्या दृष्टीने राज्यशास्त्राचा अभ्यास महत्त्वाचा आहे. राज्यकारभार चांगला चालविण्यासाठी राज्यशास्त्राचे महत्त्व लक्षात घेतले पाहिजे. वरील मुद्दे राज्यशास्त्र विषयाचे महत्व स्पष्ट करतात.

**एका दोन वाक्यात उत्तरे लिहा.**

- राज्यशास्त्राचा जनक असे कोणास संबोधले जाते?
- अरिस्टॉटल यांचा राज्यशास्त्राशी संबंधित ग्रंथ कोणता?
- अर्थशास्त्र या प्राचीन ग्रंथाचे लेखक कोण?
- ग्रामर ऑफ पॉलिटीक्स या पुस्तकाचे लेखक कोण?
- गेटल यांची राज्यशास्त्राची व्याख्या स्पष्ट करा
- राज्यशास्त्राचे महत्व सांगा